आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२३

ठळक बातम्या

- भंडारा जिल्ह्यात आयोजित शासन आपल्या दारी कार्यक्रमात शासनाच्या विविध योजनांमधील लाभार्थ्यांना लाभाचे प्रातिनिधीक स्वरुपात वितरण.
- 'महा-रेशीम अभियान २०२४'चा नागपूरात शुभारंभ, विभागीय आयुक्त आणि रेशीम संचालकांनी प्रसिद्धी रथास केलं रवाना.
- नाताळचा सण आणि हिवाळी सुट्ट्यांसाठी मध्य रेल्वेच्या ३६ विशेष रेल्वे गाड्या.

आणि

- भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव -इफ्फिचे आज गोव्यात उद्घाटन.

*****

शासन आपल्या दारी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज भंडारा जिल्ह्यात आयोजित शासन आपल्या दारी कार्यक्रमात शासनाच्या विविध योजनांमधील लाभार्थ्यांना लाभाचे प्रातिनिधीक स्वरुपात वितरण करण्यात आले. या अभियानांतर्गत भंडारा जिल्ह्यात ६ लाख ३८ हजार लाभार्थ्यांची नोंदणी झाली असून, यातील २ लाख १० हजार लाभार्थ्यांना सुमारे ३०४ कोटींचे लाभ देण्यात येत आहेत. आपल्या सरकारनं सर्वसामान्य व्यक्ती, शेतकरी यांना प्राधान्य दिल्याचं सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की केंद्रासह राज्याने देखील शेकऱ्याला ६ हजार रुपये वार्षिक द्यायला सुरु केले. असे करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरल्याचे ते म्हणाले. धानकिडीमुळे ज्या शेकऱ्यांचं नुकसान झालं आहे त्या शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही असं आश्वासन यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.

महा-रेशीम अभियान २०२४'

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी आणि रेशीम संचालनालयाचे संचालक गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते आज 'महा-रेशीम अभियान २०२४' चा शुभारंभ करण्यात आला. रेशीम शेतीसाठी  इच्छूक शेतकऱ्यांना नोंदणी करण्याचे आवाहनही करण्यात

आले आहे. विभागीय आयुक्त कार्यालय परिसरात बिदरी आणि गाडीलकर यांनी प्रसिद्धी रथास हिरवा झेंडा दाखवून रवाना करत या अभियानाची सुरुवात केली. रेशीम संचालनालयाचे उपसंचालक महेंद्र ढवळे, लेखाधिकारी शुभदा चिंचोळकर, अधिक्षक के.टी.आळे आणि जिल्हा रेशीम विकास अधिकारी स्वप्निल तायडे आदी उपस्थित होते. राज्यात २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२३ या कालावधी दरम्यान 'महा-रेशीम अभियान २०२४' अंतर्गत रेशीमशेती विषयी जनजागृती आणि प्रसिद्धी अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामधील गावोगावी प्रसिद्धी रथाच्या माध्यमातून जनजागृती व प्रसिद्धी करण्यात येणार आहे. इच्छूक शेतकऱ्यांनी संबंधित जिल्हा रेशीम कार्यालयात नोंदणी करावी असे आवाहन, विभागीय आयुक्त आणि रेशीम संचालकांनी केले आहे.

## फार्मसी आयोग विधेयक

प्रस्तावित राष्ट्रीय फार्मसी आयोग विधेयका विषयी केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं नागरिक आणि संबंधित भागधारकांकडून प्रतिक्रिया मागवल्या आहेत. राष्ट्रीय फार्मसी आयोगाची स्थापना करण्याबरोबरच १९४८ चा फार्मसी कायदा रद्द करणाऱ्या या प्रस्तावित विधेयकाचा मसुदा तयार करून तो मंत्रालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याबद्दलच्या सूचना आणि मते **hrhcell-mohfw@nic.in** या संकेतस्थळावर किंवा **publiccommentsahs@gmail.com** या मेल आयडीवर १४ डिसेंबरपर्यंत पाठवण्याचं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

## सिलक्यारा मदतकार्य

उत्तराखंडमधे सिलक्यारा बोगद्यात अडकलेल्या ४१ कामगारांना बाहेर काढण्यासाठीच्या मदतकार्याची माहिती आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी घेतली. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांच्याशी ते दूरध्वनीवरुन बोलले. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितिन गडकरी यांनी काल सकाळी घटनास्थळाला भेट दिली. त्यानंतर या कामगारांना बाहेर काढण्यासाठी ५ विविध उपाय निश्चित करुन ते राबवण्याची जबाबदारी पाच विविध यंत्रणांना देण्यात आली. तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ, सतलज जलविद्युत निगम, रेल विकास निगम मर्यादित, राष्ट्रीय महामार्ग आणि पायाभूत सुविधा विकास महामंडळ मर्यादित आणि टेहरी जलविकास महामंडळ मर्यादित या पाच यंत्रणा या कामगारांना बाहेर काढण्याच्या मोहिमेत सहभागी होणार आहेत. सरकार या

कामगारांशी सातत्यानं संपर्कात असून त्यांचं मनोबल कायम राखण्यासाठी सर्व प्रयत्न केले जात आहेत.

## पुरस्कार

विषमुक्त अन्न आणि स्वच्छ हवा तथा पाणी उपलब्ध होणे काळाची गरज ओळखत संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे स्वर्गीय कारभारी दादा गीते यांचे द्वितीय पुण्यस्मरण निमित्त गिते परिवाराच्या वतीने नासिक जिल्ह्यातील सोनोशी येथील स्व. कारभारी दादा शिवार प्रतिष्ठानतर्फे कृषी आणि तत्सम संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कृषि क्षेत्रातील मान्यवरांना "कृषी विज्ञान पुरस्कार" देऊन गौरविण्यात आले. यात डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांचाही समावेश आहे.

## ३६ विशेष रेल्वे

नाताळचा सण आणि हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वे विविध ठिकाणांहून ३६ विशेष रेल्वे गाड्या सोडणार आहे. या गाड्यांमध्ये मुंबई-थिविं, पुणे-करमळी, पनवेल-करमळी आणि पुणे-अजनी, मुंबई-मंगळुरु-मुंबई आणि मुंबई-करमळी-मुंबई दरम्यान धावणाऱ्या गाड्यांचा समावेश असणार आहे. २२ डिसेंबर २०२३ ते २ जानेवारी २०२४ दरम्यान या गाड्या धावणार आहेत. या विशेष गाड्यांच्या तिकिटांचं आरक्षण उद्यापासून विशेष शुल्क आकारून मध्य रेल्वेच्या सर्व आरक्षण केंद्रांसह **www.irctc.co.in** या संकेत स्थळावर सुरु होईल.

## इफ्फी

५४ वा इफ्फी, अर्थात भारताचा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं आज गोव्यात उद्घाटन होत आहे. बांबोळी इथल्या श्यामाप्रसाद मुखर्जी स्टेडिअममधे 'कॅचिंग डस्ट' या ब्रिटिश चित्रपटाच्या प्रदर्शनानं या महोत्सवाला प्रारंभ होईल. माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर, आणि राज्यमंत्री एल मुरुगन, तसंच गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित आहेत. कार्यक्रमाच्या रेडकार्पेट वर सध्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय अभिनेते, दिग्दर्शक यांचं सातत्याने आगमन होत आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या महोत्सवामध्ये चार पडद्यांवर यंदा २७० पेक्षा जास्त चित्रपट दाखवले जाणार आहेत. यामध्ये भारतातील २५ फिचर फिल्म आणि २० बिगर फिचर फिल्म्सचा समावेश आहे.

हॉलीवूड अभिनेते आणि निर्माते मायकेल डग्लस यांना यंदाचा ‘सत्यजीत रे’ जीवनगौरव पुरस्कार देऊनं गौरवण्यात येणार आहे.

नृत्य कार्यक्रम

विद्यार्थ्यांना भारतीय शास्त्रीय नृत्य व संगीत कलेची माहिती व्हावी या उद्देशाने पी.एम. श्री जवाहर नवोदय विद्यालय वाशीम येथे आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त ओडिसी नृत्यांगणा व संचारी फाउंडेशन, नवी दिल्ली च्या संचालिका कविता द्विवेदी यांच्या ओडिसी या शास्त्रीय नृत्याचा कार्यक्रमाचे आयोजन पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले होते. प्रथमच वाशीम शहरात आयोजित या प्राचीन भारतीय नृत्य कलेला वाशीमकर रसिक व विद्यार्थ्यांनी दाद दिली.

रोग तपासणी

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत संयुक्त कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोध मोहीम सुरु २० नोव्हेंबर पासुन सुरू करण्यात आली असुन चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्र तसेच संपुर्ण जिल्हयात सदर अभियान राबविण्यात येत आहे. कुष्ठरोग आणि क्षयरोगाच्या समूळ निर्मूलनासाठी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत २० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत या मोहिमेची अंमलबजावणी करण्यात येणार असुनसदर कालावधीत जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागामध्ये आशा स्वयंसेविका, पुरुष स्वयंसेवक व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत कुटुंबातील प्रत्येक व्यक्तींची कुष्ठरोग व क्षयरोगाची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.

हवामान

विदर्भात आज सकाळी सर्वात कमी तापमान गडचिरोली **15** पूर्णांक **6** अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले असून कमाल तापमान यवतमाळ येथे **34** अंश सेल्सिअस होते.

हेल्पलाईन

महावितरणच्या वर्धा मंडलाने वर्धा जिल्हयातील वीज ग्राहकांसाठी **24** तास उपलब्ध असणारी हेल्पलाईन सुरु केली आहे. त्यामुळे आता वीज रोहीत्रासंबंधी कृषीपंपधारक वीजग्राहकांच्या अडचणींची सोडवणूक करणे शक्य होणार आहे. महावितरणच्या वर्धा मंडलातील वर्धा, आर्वी आणि हिंगणघाट विभागातील ग्राहकांना वीज पुरवठा केला जातो. रोहीत्रासंबंधी तक्रार नोंदणीसाठी महावितरणने वर्धा जिल्हयासाठी कृषीपंपधारक वीज ग्राहकांसाठी **7875761100** हि हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

ग्राहकांनी संबंधित क्रमांकावर फोन करुन तक्रार दाखल केल्यानंतर, त्यांच्या तक्रारीची तातडीने दखल घेऊन त्यांची समस्या सोडविण्यास महावितरणकडून प्राधान्य देण्यात येणार आहे.

दुर्घटना

चंद्रपूर मध्ये अस्थी विसर्जनासाठी गेलेल्या चंद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती गोविंदा पोडे त्यांचा मुलगा आणि भाचा या तिघांचा वर्धा-इरई नदीत बुडाल्याने मृत्यू झाला. ही घटना सायंकाळी उघडकीस आली असून एकाचा मृतदेह मिळाला तर अन्य दोघांचा शोध सुरू आहे.

*******